प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | सतिष पांडुरंग मुळे, वय ३४ वर्ष, व्यवसाय नोकरी, वर्ग ३, कनिष्ठ लिपीक, रोजगार हमी विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०,०००/-- रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २०,०००/— रूपये |
| घटनास्थळ | तहसिल कार्यालय बुलडाणा येथील बस स्टॉप जवळ |
| घटना तारीख | १७.०१.२०२० |

थोडक्यात हकीकत :— तक्रारदार यांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन सन २०१५ पासुन प्रलंबित असलेल्या सिंचन विहीरी का पुर्ण केल्या नाही याबाबत नोटीस मिळाली असुन त्यामध्ये खुलासा सादर करणेबाबत कळविण्यात आले त्यानुसार तक्रारदार हे जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा येथील कनिष्ठ लिपीक सतिष पांडुरंग मुळे यांना दि.१४.०१.२०२० रोजी भेटले असता त्यांचे विरुध्द संबंधित प्रकरणात कार्यवाही न करणेसाठी आलोसे कनिष्ठ लिपीक यांनी २५,०००/— लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार अॅन्टी करप्शन ब्युरो बूलडाणा घटकाकडे नोंदविली होती.

सदर तक्रारीवरुन दिनांक १७.०१.२०२० रोजी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता लोकसेवक सतिष पांडुरंग मुळे रोजगार हमी विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा यांनी तक्रारदार यांना प्रलंबित सिंचन विहीरी संबंधाने निघालेल्या नोटीसीवरुन कार्यवाही न करण्यासाठी पंच क्र. १ यांचे समक्ष तडजोडी अंती २०,०००/— लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम २०,०००/— रुपये स्विकारण्याची संमती दर्शविल्याने दिनांक १७.०१.२०२० रोजी रितसर सापळा कार्यवाही आयोजित केली असता लोकसेवक सतिष मुळे यांनी पंच क्र. १ यांचेसमक्ष लाच रक्कम २०,०००/— रुपये डावे हाताने स्विकारुन शर्टाचे डावे बाजुचे खिश्यात ठेवले. आरोपी लोकसेवक सतिष पांडुरंग मुळे, वय ३४ वर्ष, व्यवसाय नोकरी, वर्ग ३, कनिष्ठ लिपीक, रोजगार हमी विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा यांनी आपले लोकसेवक पदाचा गैरवापर करुन स्वत:साठी पैश्याचे स्वरुपातील अर्थिक लाभ मिळविण्यासाठी लोकसेवक पदाला न शोभनारे गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द पो.स्टे. बुलडाणा शहर अप.नं. २८/२०२० कलम ७ भ्रष्टाचार प्रतीबंधक अधिनियम १९८८ संशोधन २०१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही :— १. मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

२. मा. श्री. पंजाबराव डोंगरदिवे अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्रीमती अर्चना जाधव, पोलीस निरीक्षक अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा व सापळा पथकातील स्टाफ यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२—२४२५४८ व ९६६५७०६६७७ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे

पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

Scanned with CamScanner